# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/10/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा मसला येथे दिनांक १२/१०/२०२३ चे १२.३० वा. ते १६.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— धर्मरक्षक अमृत गजभिये, वय ४५ वर्ष, रा. मसला हे शेतात कामाला गेले होते. मुलगी शाळेत गेली होती. दूपारी १६/१५ वा. सूमारास शाळेतून घरी परत आली असता तिने फिर्यादीला फोन करून सांगितले कि, दाराचे कूलूप तूटलेले व दार उघडे दिसले व घरातील बेडरूममधील दोन्ही लोखंडी कपाटाचे दार उघडे दिसले कपाटात ठेवलेला स्टीलचा डब्बा चोरीस गेलेला दिसला, स्टीलच्या डब्यात फिर्यादीचे पत्नीचे दागिणे १) ०३ ग्रॅम सोन्याचे पदक व ५० सोन्याचे लहान मनी असलेला एकूण १५ ग्रॅमचे एक मंगळसूत्र किंमती २०,०००/— रू २) ०३ ग्रॅम सोन्याचे झूमके एक जोड किंमती ७,०००/— रू. ३) तीन ग्रॅम सोन्याचे रींग एक जोड किंमती ७,०००/—रू ४) एक सोन्याचा गोफ १२ ग्रॅम किंमती १८,०००/—रू व नगदी ५,०००/— रू. असा एकूण ५७,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दत्ता बघमारे मो. नं. ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. पारशिवनी** :— दिनांक ०८/०४/२०२३ चे १४/०० वा. ते दि. १६/०९/२०२३ चे १५/०० वा. दरम्यान आरोपी नामे— सुनिल राजु खिरेकर, वय २४ वर्ष, रा. माहुली, ता. पारशिवनी याने फिर्यादी/पिडीतेला लग्नाचे आमिष दाखवुन फिर्यादी/पिडीताचे इच्छेविरूदध तसेच संमती नसतांना फिर्यादी/पिडीता सोबत वारंवार शारिरीक संबंध केले. फिर्यादी/पिडीता आरोपीला लग्नाकरिता आग्रह करीत होती परंतु आरोपी फिर्यादी/पिडीतेला नंतर पाहु असे म्हणुन लग्नास टाळाटाळ करीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (द) भा.द.वी. सहकलम ३(१)(प)(प)३(२)(अ) अ.जा. व ज. अ.प्र .सु अधि २०१५ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे पोस्टे पारशिवनी मो. नं. ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर